सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
जिल्हा परिषद, गडचिरोली
जिल्हा पेसा कक्ष, (ग्राम पंचायत विभाग)
जिल्हा पेसा कक्ष जि.प. गडचिरोली तळ मजला, खोली क्र. १९, मुल रोड, कॉम्पलेक्स गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनी क्र. ०७१३२-२२२३०८ ईमेल - dceopanchayatgadchiroli@gmail.com
pesacellzpgadchiroli@gmail.com

| जा.क्र./जिपग/स्वा.शुल्क/प्र.क्र.१०५/432/२०२६-२७ | दिनांक : 8 ऑक्टोंबर, २०२६ |
|---|---|

प्रति,

१. सरपंच/प्रशासक/ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत कार्यालय, ------------ (सर्व)

२. अध्यक्ष/सचिव
सामुहिक वन हक्क व्यवस्थापन समिती (CFRMC) -------------- (सर्व)

मार्फत : गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ------------------------ (सर्व)

विषय : पंचायतींचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तार) अधिनियम, १९९६ व अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६, नियम २००८ व सुधारित नियम २०१२.
<u>अनुसूचित क्षेत्रातील गौण वनोत्पादनाच्या विक्रीपासून प्राप्त उत्पन्न/स्वामित्वधन विहित खात्यात जमा करणे, त्याचे लेखे ठेवणे आणि ग्रामसभेच्या मान्यतेने गावस्तरावरील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व अंगणवाडी केंद्रातील पायाभूत सुविधांची कामे प्राधान्याने विचारात घेणेबाबत...</u>

संदर्भ : १. मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, यांचेकडील पत्र जाक्र. पेसाअ-२०२२/प्र.क्र.५६/पं.रा.-२, दिनांक २९ एप्रिल, २०२२

२. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : वहका-२०१४/प्र.क्र.६६/का-१४, दिनांक २४ जुन, २०१५

३. या कार्यालयाचे पत्र जा.क्र./पेसा/प्र.क्र.१३७/M.F.P./३८७/२०२६-२७, दिनांक ०८ सप्टेंबर, २०२६

****

उपरोक्त विषयांकित व संदर्भांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६, नियम २००८ व सुधारित नियम २०१२ अंतर्गत गडचिरोली जिल्ह्यातील एकूण १४०९ ग्रामसभांना कलम ३ (१) (ग) अन्वये गावाच्या सीमांतर्गत किंवा

सीमांबाहेर पारंपारिकरीत्या गौण वनोत्पादन गोळा करणे, त्याचा वापर करणे किंवा विल्हेवाट लावणे यासाठी स्वामित्व हक्क; आणि कलम ३ (१) (झ) अन्वये सामूहिक वनसंसाधनाचे संरक्षण, पुनर्निर्माण, संवर्धन किंवा व्यवस्थापन करण्याचा हक्क; मान्य करण्यात आलेला आहे.

तसेच महाराष्ट्र अनुसूचित क्षेत्रांतील गौण वनोत्पादनाच्या मालकीचे हस्तांतरण व महाराष्ट्र गौण वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, १९९७ (१९९७ चा महा. ४५) च्या **कलम ४ (१)** नुसार (मा. राज्यपाल महोदयांची अधिसूचना दिनांक १९ ऑगस्ट, २०१४ अन्वये सुधारित) अनुसूचित क्षेत्रातील शासकीय जमिनीमध्ये (राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये वगळून) आढळणाऱ्या गौण वनोत्पादनाची मालकी संबंधित **पंचायत व ग्रामसभा** यांच्याकडे निहित करण्यात आलेली आहे. उक्त कलम ४ (१) च्या **दुसऱ्या परंतुकानुसार** (मा. राज्यपाल महोदयांची अधिसूचना दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६) गौण वनोत्पादनाचे संकलन, वापर व विल्हेवाट तसेच विक्रीपासून प्राप्त उत्पन्नाचा विनियोग यांबाबतचे सर्व निर्णय ग्रामसभा किंवा ग्रामसभेच्या मान्यतेने केवळ ग्रामसभा सदस्यांची मिळून बनलेली समिती घेईल. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) च्या **कलम ५४-अ, खंड (फ)** नुसार ग्रामसभा तिच्याकडे निहित असलेल्या गौण वनोत्पादनाचे विनियमन, समुपयोजन, व्यवस्थापन व व्यापार यांबाबत केवळ पंचायतीला निदेश देण्यास सक्षम असून **कलम ५४-ब, खंड (ग)** नुसार संबंधित पंचायत त्यानुसार गौण वनोत्पादनाचे समुपयोजन, व्यवस्थापन व व्यापार यांचे विनियमन करण्यास सक्षम आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या **कलम ५७, पोटकलम (२), खंड (च-क)** नुसार पंचायतीच्या अधिकारितेतील व त्या पंचायतीकडे निहित असलेल्या, अनुसूचित क्षेत्रात गोळा केलेल्या गौण वनोत्पादनाच्या विक्रीचे उत्पन्न किंवा स्वामित्वधन **"ग्रामनिधीमध्ये"** जमा करण्याची तरतूद आहे. संदर्भ क्र. १ वरील पत्रान्वये (मुद्दा क्र. ६) सदर उत्पन्न व स्वामित्वधन ग्रामनिधीमध्ये जमा करण्याचे व त्यातून सार्वजनिक उपक्रमांसाठी निधीची विनियोग करण्याचे व कोणत्याही स्वरूपाचे वैयक्तिक लाभ न देण्याचे निर्देश शासनाने दिलेले आहेत. तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करण्याबाबत) नियम, २०१४ च्या **नियम १४ ते १६** नुसार ग्रामसभा कोष व ग्रामसभानिहाय लेखे यांची तरतूद असून, सामूहिक वनहक्क मान्य झालेल्या क्षेत्रातील महसूल संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयाच्या **परिच्छेद ५ (८)** व ८ नुसार सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समितीच्या बँक खात्यामार्फत, ग्रामसभेच्या मान्यतेने संनियंत्रित करावयाचा आहे.

मात्र जिल्ह्यातील काही ग्रामपंचायती व पेसा गावांमध्ये असे निदर्शनास आले आहे की, गौण वनोत्पादनाच्या विक्रीपासून प्राप्त रक्कम उपरोक्त विहित खात्यांऐवजी स्वयंघोषित समित्या, गृप ऑफ ग्रामसभा, महाग्रामसभा, ग्रामसभा महासंघ, इलाका महाग्रामसभा अथवा अन्य अनधिकृत व्यक्ती/संस्थांकडे जमा केल्या जात आहे, तसेच बहुतांश ठिकाणी सदर रक्कमेचा विनियोग ग्रामसभेच्या ठरावाशिवाय परस्पर किंवा वैयक्तिक लाभासाठी करण्यात आलेला आहे. ही बाब उपरोक्त तरतुदींशी विसंगत असल्याने याद्वारे खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. **विहित बँक खात्यात रक्कम जमा करणे व लेखे ठेवणे :** गौण वनोत्पादनाच्या विक्रीपासून प्राप्त उत्पन्न व स्वामित्वधन खालीलप्रमाणे विहित बँक खात्यातच जमा करण्यात यावे. अनधिकृत व्यक्ती/संस्थांकडे असलेली रक्कम तात्काळ संबंधित विहित खात्यात वर्ग करण्यात यावी.

(अ) पंचायतीकडे निहित गौण वनोत्पादनाच्या विक्रीचे उत्पन्न/स्वामित्वधन महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ५७ (२) (च-क) व संदर्भ क्र. १ नुसार **"ग्रामनिधी"** मध्ये जमा करावे. ग्रामपंचायतीमध्ये एकापेक्षा अधिक ग्रामसभा (पेसा गावे) असल्यास प्रत्येक ग्रामसभेची रक्कम पेसा नियम १६ नुसार **स्वतंत्र लेख्यात** दर्शविण्यात यावी व तिचा विनियोग केवळ संबंधित ग्रामसभेच्या ठरावानुसार त्याच गावाच्या विकासासाठी करण्यात यावा. सदर निधीचा समावेश ग्रामपंचायत विकास आराखड्यातील उत्पन्नाच्या स्त्रोतांमध्ये (Resource Envelope) **स्व-उत्पन्न** (OSR) घटकांतर्गत करावा. अंशतः अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींनी अशा निधीचा विनियोग कलम ५८ (२) नुसार केवळ अनुसूचित क्षेत्रातील भागाच्या विकासासाठीच करावा.

(ब) सामूहिक वनहक्क मान्य झालेल्या क्षेत्रातील गौण वनोत्पादनाचे उत्पन्न संदर्भ क्र. २ च्या परिच्छेद ५ (८), ५(१५) व ८(१) नुसार सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष, सचिव व खजिनदार यांच्या **संयुक्त बँक खात्यात** जमा करावे. या खात्यातील स्वामित्व शुल्काची रक्कम **ग्रामसभेच्या मान्यतेने "ग्रामनिधी: मध्ये जमा करण्यात यावी** आणि परिच्छेद ८(५) नुसार सर्व लेखे ग्रामसभा स्तरावर ठेवून त्यांचे लेखापरीक्षण जिल्हा परिषदेच्या स्थानिक निधी लेखा परीक्षकाकडून करून घ्यावे.

(क) ग्रामसभा कोषात जमा झालेल्या रकमांचे लेखे पेसा नियम १४ ते १६ व आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. पेसा-२०१५/प्र.क्र.९८/का-१७, दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ नुसार अद्ययावत ठेवण्यात यावेत, असे संदर्भ क्र. १ (मुद्दा क्र. ४ व ५) अन्वये यापूर्वीच कळविण्यात आलेले आहे. त्याचे काटेकोर पालन करावे.

२. **वैयक्तिक लाभास प्रतिबंध : गौण वनोत्पादनाच्या विक्रीतून** ग्रामनिधीमध्ये जमा झालेल्या उत्पन्न/स्वामित्वधनातून कोणत्याही स्वरूपाचे वैयक्तिक लाभ देण्यात येऊ नयेत (संदर्भ क्र. १, मुद्दा क्र. ६). इतर विहित खात्यांतील रकमेचा विनियोग ग्रामसभेच्या ठरावानुसारच करण्यात यावा.

३. **विक्री दर :** गौण वनोत्पादनाची विक्री केंद्र शासनाने निश्चित केलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षा (MSP) कमी दराने होणार नाही याची दक्षता संबंधित समुचित स्तरावरील पंचायत, ग्रामसभा, सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समिती/संबंधित समितीने घ्यावी (संदर्भ क्र. २, परिच्छेद ५ (७). विक्रीपासून प्राप्त उत्पन्नाच्या विनियोगाबाबतचे सर्व निर्णय ग्रामसभेच्या मान्यतेस सादर करावेत (पेसा नियम ४१ (६); वनहक्क नियम ४ (१) (छ).

४. **उत्पन्नाच्या विनियोगाचे नियोजन :** गौण वनोत्पादन गोळा करणाऱ्या स्थानिक आदिवासी व पारंपारिक वन निवासींना द्यावयाची मजुरी/संकलन मोबदला आणि गावाच्या सामूहिक विकास कामांसाठी राखून ठेवावयाचा हिस्सा यांचे प्रमाण ग्रामसभेने ठरावाद्वारे निश्चित करावे. यामध्ये जास्तातजास्त **८०% रक्कम मजुरी व कमितकमी २०% रक्कम स्वामित्व शुल्क (सामूहिक विकास निधी)** असे प्रमाण ग्रामसभने विचारात घ्यावे

५. **शाळा व अंगणवाडी केंद्रातील पायाभूत सुविधांना प्राधान्य :** जिल्ह्यातील दुर्गम व आदिवासी भागातील शालेय पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी, सामूहिक विकास हिश्श्यातून कामे निश्चित करताना गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व अंगणवाडी केंद्रातील खालील कामांचा ग्रामसभेने प्राधान्याने विचार करावा.

1) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व अंगणवाडी केंद्रांचे बांधकाम व किरकोळ व तातडीची दुरुस्ती करणे.
2) विद्यार्थी व बालकांसाठी पिण्याच्या शुद्ध व सुरक्षित पाण्याची (Water Purifier/RO) कायमस्वरूपी व्यवस्था करणे.
3) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व अंगणवाडी केंद्रांमध्ये सुरक्षित विद्युत व्यवस्था व सौर ऊर्जा प्रकाश व्यवस्था करणे.
4) विद्यार्थ्यांना बसण्यासाठी दर्जेदार बाकडे (बेंचेस), सतरंज्या व चटई इत्यादी बैठक व्यवस्था उपलब्ध करणे.
5) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व अंगणवाडी केंद्रांमधील स्वतंत्र शौचालय बांधकाम व मुताऱ्यांची दुरुस्ती, नळजोडणी व नियमित स्वच्छता राखणे.
6) शाळा व अंगणवाडी केंद्रांची रंगरंगोटी, बालस्नेही चित्रकला (BALA) व सुशोभीकरण करणे.
7) विद्यार्थ्यांच्या शारीरिक व क्रीडा विकासासाठी क्रीडांगण तयार करणे व क्रीडा साहित्य पुरविणे.
8) जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये डिजिटल साधने, संगणक/प्रोजेक्टर (Smart Class) व वाचनालयासाठी ज्ञानवर्धक पुस्तके उपलब्ध करून देणे.
9) शाळा व अंगणवाडी केंद्रांच्या सुरक्षिततेसाठी संरक्षक भिंत/कुंपण घालणे.
10) गौण वनोत्पादनाच्या विक्रीतून प्राप्त रक्कम व स्वामित्वशुल्काच्या कमाल ५०% रक्कम उपरोक्त बाबींवर विनियोगात आणता येईल.

वरील कामे निश्चित करताना ती महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ५४-अ, खंड (ब) नुसार ग्रामसभेच्या पूर्वमान्यतेने ग्रामपंचायत विकास आराखड्यात समाविष्ट करावीत. नियमित शासकीय योजना, वित्त आयोग किंवा पेसा ५% थेट निधी योजनेतून घेतल्या जाणाऱ्या कामांची पुनरावृत्ती (Duplication) होणार नाही याची दक्षता घ्यावी (संदर्भ क्र. १, मुद्दा क्र. ३). तसेच संदर्भ क्र. २ च्या परिच्छेद ९ नुसार विविध विभागांच्या योजनांच्या अभिसरणाचा लाभ घेण्यात यावा आणि कामांचे नियोजन संबंधित शाळा व्यवस्थापन समिती व अंगणवाडी सेविका यांच्याशी समन्वयाने करावे.

६. **गौण वनोत्पादनाचे जतन, संवर्धन, प्रक्रिया, मूल्यवर्धन, साठवणूक व विपणन :**
गौण वनोत्पादनाच्या विक्री व स्वामित्व शुल्काची उर्वरीत 50% रक्कम गौण वनोत्पादनाचे जतन, संवर्धन, प्रक्रिया, मूल्यवर्धन, साठवणूक व विपणन या बाबींसाठी विनियोगात आणून गौण वनोत्पादनाच्या माध्यमातून स्थानिक आदिवासी व पारंपरिक वन निवासी यांच्या शाश्वत उपजीविकेसाठी सामूहिक स्वरूपाचे उपक्रम हाती घेता येतील.

७. **ग्रामसभा व कृती आराखडा :** सर्व ग्रामपंचायतींनी ग्रामसभेचे आयोजन करून वरील बाबींवर ठराव घ्यावा व त्यानुसार कृती आराखडा पंचायत समितीमार्फत जिल्हा परिषदेच्या जिल्हा पेसा कक्षाकडे सादर करावा. गट विकास अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील ग्रामनिधी, ग्रामसभा कोष व सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समित्यांच्या लेख्यांची तपासणी करून, ग्रामपंचायत लेखा संहिता, २०११ चे पालन होत असल्याची खात्री करावी (संदर्भ क्र. १, मुद्दा क्र. ४).

सदर सूचना समुचित स्तरावरील पंचायत व ग्रामसभेच्या वैधानिक अधिकारांना कोणतीही बाधा न आणता, गौण वनोत्पादनाच्या उत्पन्नाच्या व्यवस्थापनात पारदर्शकता व उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी

संयुक्तपणे निर्गमित करण्यात येत आहेत. याबाबत काही संदिग्धता उत्पन्न झाल्यास राज्य पेसा कक्षामार्फत राज्याच्या ग्रामविकास व पंचायतराज विभागाकडे संपर्क साधावा.

(सुहास गाडे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**

(अविश्यांत पंडा भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी, गडचिरोली**

प्रत,

१. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) वनविभाग, गडचिरोली यांना माहिती सादर.
२. सहा. जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली/अहेरी/भामरागड यांना माहितीस व कार्यवाहीस्तव अग्रेषित.
३. उपविभागीय अधिकारी (सर्व) -------------------- यांना माहितीस व कार्यवाहीस अग्रेषित.
४. अपर आयुक्त (विकास) तथा नोडल अधिकारी (पेसा), विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव.
५. अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली/अहेरी यांना माहितीस अग्रेषित.
६. संचालक, राज्य पेसा कक्ष, महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीस अग्रेषित.
७. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) तथा नोडल अधिकारी (पेसा) जिल्हा परिषद, गडचिरोली यांना माहितीस अग्रेषित.
८. तहसीलदार (सर्व)---------------------- यांना माहितीस व कार्यवाहीस अग्रेषित.
९. गट विकास अधिकारी, पंचायत समिती ------------------------
/- सदर पत्र सरपंच/प्रशासक/ग्रामपंचायत अधिकारी --- (सर्व) व अध्यक्ष/सचिव सामुहिक वन हक्क व्यवस्थापन समिती (CFRMC) यांना उपलब्ध करुन दिल्याच्या पत्राची पोचपावती उलट टपाली या कार्यालयास सादर करण्यास्तव अग्रेषित.
१०. स्था- वन हक्क शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली.
११.स्था - जिल्हा पेसा कक्ष, जिल्हा परिषद, गडचिरोली.